# नागपूर संमेलनापुढील कार्य

लेखकः—द. वा. पोतदार, बी. ए.

संपादक, म. सा. पत्रिका, पुणें २.

पु।१८

[ आर्यसंस्कृति मुद्रणालय, टिळक रस्ता, पुणें २ ]

पु। ९८

# नागपूर सम्मेलनापुढील कार्य

यंदा नागपुरास साहित्यसंमेलन भरणार आहे व त्याची बहुतेक सर्व पूर्व-तयारी झालेली आहे. नागपूरकरांच्या उत्साहाने हें संमेलन उत्कृष्ट तऱ्हेने पार पडेल आणि पूर्वी दिलेलें पण पुरें न केलेलें आमंत्रण आता दुप्पट उत्साहाने उभयपक्षीं येईल अशी आम्हांस आशा आहे.

यंदाचे अध्यक्ष रा. कृष्णाजीपंत खाडिलकर हे सुप्रसिद्ध नाटककार व विख्यात संपादक म्हणून महशूर आहेत. परंतु म. सा. परिषद् या संस्थेचे तिच्या जन्माच्या वेळचे ते एक प्रमुख सूत्रधार होते ही जुनी आणि म्हणून कदाचित् अलीकडील लोकांच्या स्मरणांत नसलेली गोष्ट लक्षांत घेतली तर परिषदेला या निवडीबद्दल विशेषच आनंद वाटणें कसें स्वाभाविक आहे हें निराळें सांगण्याची गरज नाही. या गोष्टीस सुमारें वीस वर्षे होऊन गेलीं. आणि ज्या कारणामुळे रा. खाडिलकर यांस परिषदेशीं संबंध तोडावा लागला, कांही अंशीं त्याच कारणामुळे अध्यक्षपदीं त्यांची निवड यापूर्वी व्हावयास पाहिजे असूनहि ती सिद्धीस गेली नाही. नागपूरकरांचे या सुयोगाबद्दल आम्ही मनापासून अभिनंदन करतों.

आता असें म्हणण्यास हरकत नाही की, म. सा. संमेलनें सालोसाल भरत जातील. संमेलन भरविण्यासंबंधाने कोणाची मागणीच येत नाही, कोणीहि उत्साह दाखवीत नाही अशी जी तक्रार कै. रामभाऊ मोरमकर यांचे वेळीं ऐकूं येत असे ती अजीबात नाहीशी होऊन आता आमंत्रणांची चुरस लागलेली पाहण्याचा रंग दिसत आहे. यामुळे हीं संमेलनें कां भरवावीं, कशीं भरवावीं आणि त्यास अधिक कार्यक्षम कसें करावें असे प्रश्न जोराने पुढे येत आहेत म्हणून त्यासंबंधी कांही विचार पुढे मांडणें उचित होईल असें आम्हांस वाटतें.

ही गोष्ट अगदी खरी आहे की, हल्ली होणारीं संमेलनें हीं साहित्य-प्रेमाने उत्साहित झालेल्या लोकांच्या सभासारखीं होतात. परस्परपरिचय, अनेक विषयांचा घाईघाईने केलेला विचार, वक्त्यांच्या व विद्वानांच्या चकमकी आणि मोठाल्या प्रतिज्ञा, धमक्या, आशा आणि योजना यांचे हीं संमेलनें म्हणजे बहुविध प्रदर्शनेंच होतात असें म्हटलें पाहिजे. साहित्यप्रेमाचा, काव्यगायनाचा आणि वक्तृत्वाचा पूर खळाळ वाहतो आणि पुढे मग आंतील घटकाभर अदृश्य झालेले अडचणीचे खडक आपले तीक्ष्ण जबडे आ पसरून बसलेले दिसूं लागतात. सरकार आणि विद्यापीठ यांच्या तर हीं संमेलनें खिसगणतींतहि नाहीत. मोठमोठे ग्रंथकार व लेखक असे कित्येक आहेत की, जे यांपासून अलिप्त राहण्यांतच भूषण मानतात. आणि निष्क्रिय-पणाच्या आरोपाचें जड ओझें पोटीं घेऊन धांझोटपा साहित्य परिषदेचें अधिकारी-

मंडळ विषण्ण होऊन चौथाईची भीक अखेर निर्विवादपणें किती पदरांत पडेल या विषयी सचिंतपणाने परततात. कोणीकडे तो संमेलनाचा उत्साह व कोणीकडे ही परिषदेची दैना ! केवढा हा दारुण विरोध !

हा विरोध मोडून **संमेलन आणि परिषद् यांचा एकजीव करणें** हें महाराष्ट्राचें पहिलें कर्तव्य आहे. हा एकजीव कसा करावा हाच काय तो मुख्य प्रश्न आहे. आमच्या मतें परिषदेचे सभासद शेकड्यांनी वाढविणें, किंबहुना यच्चयावत् संपादक, लेखक, ग्रंथकार, प्रकाशक, साहित्यभक्त व विद्वान् या सर्वांस परिषदेसारख्या मध्यवर्ती संस्थेचें महत्त्व पटवून तिचें सदस्यत्व अभिमानपूर्वक त्यांस स्वीकारावयास लावणें हाच प्रस्तुतच्या अडचणीवर आणि विरोधावर परिणामकारक तोडगा होय. जसजशीं लहान मोठीं स्थानिक साहित्यमंडळें स्थापन होतील व कार्यक्षम होतील तसतसें हें काम कार्यक्षम व सुकर होऊन त्यांचा परिषदेशीं पोष्य, पोषक किंवा सहकारी संबंध दाट वाढून प्रस्तुत दिसणारें द्वैत किंवा औदासीन्य काढितां येईल. या दृष्टीने कोल्हापूर मुक्कामीं साहित्य-परिषदेच्या नियामक मंडळाचे प्रादेशिक सभासद घेण्याची जी योजना ठरली तिच्यांतील तत्त्व अत्यंत अभिनंदनीय आहे हें कोणीहि कबूल करील.

संमेलनें सालोसाल नियमाने व कांही एका धोरणाने जर भरविणें जरूर अवश्य असेल तर त्यासाठी एखादी सुयंत्र आणि संघटित नियामक संस्थाच असणें अवश्य आहे. ही जरूरी अनुभवास आल्यामुळेच महाराष्ट्र-साहित्य-परिषदेची स्थापना संमेलनानेच केली. **संमेलनांतून परिषद् निघाली हें खरें आहे; पण तशी ती निघाल्यावर संमेलन अशाप्रकारें परिषदेच्या अधीन झालें.** सालोसाल योग्य स्थळीं संमेलनें भरतील अशी व्यवस्था करणें ही जबाबदारी या संघटित परिषदेवर याप्रमाणे पडली. पहिलीं सुमारें १०–१५ वर्षें ही जबाबदारी परिषदेने समाधानकारक रीतीने पार पाडली असें म्हणवत नाही. अलीकडे **परिषदेपेक्षा लोकांच्या उत्साहानेच** संमेलनें नियमाने होऊं लागलीं आहेत. परंतु यामुळे परिषदेविषयीची एक प्रकारची अढी जी लोकांच्या मनांत बसून गेली ती साफ निघण्यास वेळ लागत आहे. परिषदेचें काम सेवाबुद्धीने आणि शिस्तीने जर चालू राहील तर आम्हांला ही खात्री आहे की खरोखरच परिषदेचे सभासद पुष्कळच वाढतील. **निदान एक हजार सभासद** मराठी साहित्याचा संसार पाहण्यासाठी आत्मप्रेरणेने थोडासा वार्षिक स्वार्थत्याग करून एकत्र जुळण्यास व एका संघटनेंत अंशभागी होण्यास अनुकूल करतां येतील तर हें सर्व मनाजोगतें जुळून येईल. गेलीं पांच सात वर्षें जीं संमेलनें भरलीं तीं बऱ्याच दूरदूरच्या ठिकाणीं स्थानिक लोकांनी मोठ्या प्रेमाने आणि उल्हासाने भरविलीं. प्रथम कांही वर्षें परिषदेवरील अढी बरीच जाचली. अलीकडे परिषदेचेंच बळ वाढविलें पाहिजे हा विचार लोकांच्या मनांत हळूहळू अधिकाधिक ठसत चालला आहे. आणि हाच क्रम पुढे चालवून जर सर्व धोरण आंखलें जाईल तर परिषद् आणि संमेलन हीं लौकरच एकजीव होतील. संमेलनांच्या स्थानिक कार्यकर्त्यांच्या अनेक अडचणी

असतात आणि हेतूहि पुष्कळ वेळां अनेक असतात. त्यामुळे परिषदेचें बळ वाढविण्याचें काम अद्यापि या कार्यकर्त्यांकडून घडूं शकलें नाही.

खरी अडचण अशी आहे की, साहित्यविषयक संस्था—म्हणजे नांवारूपाला आलेल्या आणि बरींच वर्षे चाललेल्या अशा संस्था—अजून आपल्याकडे फारशा नाहीत. बडोद्याची जुनी सहविचारिणी सभा किंवा पुण्याची डेक्कन् व्हर्न्याक्युलर् ट्रान्स्लेशन् सोसायटी अशा कांही जुन्या संस्था सोडल्या तर अशा फारच थोड्या वाङ्मयसंस्था प्रमुख शहरीं सुद्धा आढळून येतील की ज्या प्रौढी व प्रतिष्ठा या दृष्टीने सर्वमान्य झाल्या आहेत. संमेलनाच्या कार्यापुरतें एखादें नवेजुने स्थानिक साहित्यमंडळ मुक्रर करण्यांत येतें. परंतु इंदूरच्या मराठी ग्रंथोत्तेजक–मंडळाप्रमाणे टिकून असें काम संमेलनानंतर कोठेच होत नाही. तेव्हा संलग्न-संस्था कायम करण्याविषयी स्थानिक साहित्यप्रेमी मंडळीमध्ये जागृति उत्पन्न करून **कित्येक केंद्रें टवटवीत ठेवण्याचें काम** साहित्य परिषदेने संमेलनाच्या सुयोगाचा फायदा घेऊन घडवून आणिलें पाहिजे. बेळगांव, ग्वाल्हेर, गोवा ( मडगांव ), हैद्राबाद, कोल्हापूर इत्यादि ज्या ठिकाणीं सम्मेलनें भरलीं त्या ठिकाणीं तरी ज्या संलग्न-संस्थांनी तीं भरवलीं त्यांनी आपला संसार विसकटला असल्यास पुनः सावरून जोमाने आपल्या कार्यास प्रारंभ केला पाहिजे. अशीं बलिष्ठ स्थानिक केंद्रें पाठीशीं असल्याशिवाय मध्यवर्ती परिषदेला आवश्यक ती पुष्टी कधीहि प्राप्त होणार नाही. संलग्न-संस्थांच्या प्रतिनिधींची आणि परिषदेच्या कार्यकारी मंडळाची एक **संयुक्त बैठक दरसाल सम्मेलनांत व्हावी** आणि संयुक्त अगर संलग्न-संस्थांचे अहवाल सम्मेलनप्रसंगीं परिषदेस सादर करण्यात यावे. या कामाचा **उपक्रम यंदा नागपुरास** व्हावा अशी आमची आग्रहाची सूचना आहे.

संमेलन व परिषद् एकजीव करण्यासाठी परिषदेच्या हल्लीच्या घटनेंत आमच्या मतें **हिंदी-साहित्य-संमेलनाच्या घटनेप्रमाणे जवळजवळ आमूलाग्र फरक करणें** अत्यंत फायदेशीर होईल. महाराष्ट्र-साहित्य-परिषदेची घटना करतेवेळीं वंगीय साहित्य–परिषदेचा नमुना घटनाकारांपुढे होता असें दिसतें. वंगीय–साहित्य–परिषदेची घटना आमच्या पाहण्यांत अद्यापि आली नाही. परंतु हिंदी–साहित्य–संमेलनाची घटना आमच्याजवळ आहे आणि ज्या वेळीं महाराष्ट्र–साहित्य–परिषदेची पुनर्घटना करण्यासाठी समिति नेमून विचार झाला त्या वेळीं हिंदी–साहित्य–संमेलनाची घटना अनुसरावी असें आम्ही सुचविलें होतें. परंतु तसें झालें नाही. आमच्या मनाची खात्री झालेली आहे की, हिंदी–साहित्य–संमेलनाच्या घटनेंत कित्येक गोष्टी किंबहुना बऱ्याच गोष्टी अशा आहेत, की ज्यांचा समावेश आपण अवश्यमेव आपल्या घटनेंत करून म. सा. प. ची सबंध घटना तदनुसार बदलावी.

हिंदी–साहित्य–सम्मेलनाच्या घटनेसंबंधाने थोडी कल्पना येथे देतों. प्रथम उद्देशांतच दोन तीन गोष्टी घेण्यासारख्या आहेत. हिंदी भाषा अधिक सुगम, मनोरम आणि लाभदायक करणें; तिच्यांतील अभाव दूर करणें; तिच्या शैली आणि त्रुटि यांची

शुद्धि करणें; तसेंच पाठशाळा, कॉलेजें, विद्यापीठें, स्थानिक स्वराज्य-संस्था, अदालती, छोटे मोठे जहागिरदार, देशी संस्थानिक व सरकार यांच्या व्यवहारांत हिंदीचा प्रचार करविणें; ग्रंथकार, लेखक व संपादक यांना पारितोषकें, प्रशंसापत्रें, पदकें किंवा पदव्या देणें; उच्च शिक्षण घेतलेल्या तरुण मंडळींत हिंदीविषयी अनुराग उत्पन्न करणें; अवश्य तेथे हिंदी पाठशाळा, हिंदी सभा आणि पुस्तकालयें स्थापन करणें आणि असतील त्यांस साहाय्य देणें वगैरे प्रकारची उद्देशांची रचना पाहिली आणि आपल्या परिषदेच्या उद्देशांकडे नजर वळविली तर आपल्या प्रत्यक्ष गरजा काय आहेत त्या पाहिल्या असतां आपल्या उद्देशकथनापेक्षा हिंदी-साहित्य-परिषदेचें उद्देशकथन अधिक आकर्षक व व्यावहारिक आहे हें सहज दिसून येईल. उदाहरणार्थ इतिहास-संशोधनाबाबतचा आपला उद्देश देऊं. परिषद् रितसर स्वतंत्रपणें स्थापन होण्यापूर्वीं इतिहास–संशोधनासंबंधाने परिषदेने राजवाड्यांचा दहावा खंड १९०९ मध्ये कसाबसा प्रसिद्ध केला तोंच भारत–इतिहास–संशोधकमंडळाची स्वतंत्रपणें स्थापना करावी लागली. त्या मंडळाने गेल्या वीस वर्षांत आपलें स्वतःचें मंदिर सिद्ध करून दरवर्षीं सुमार पांच हजार रुपये जमवून पांचपन्नास पुस्तकें व एक त्रैमासिक प्रसिद्ध करून, दोन पगारी संशोधक वगैरे ठेवून आपला संसार चालविला आहे. तो अनुभव आपणांस पुष्कळ बोधप्रद होईल. गेल्या थोड्या वर्षांत धुळें येथे राजवाडे संशोधन-मंदिर हेंहि सुसज्जित झालें आणि या मंदिराला साहाय्य करण्यासाठीं प्रस्ताव आणि वर्गण्या खुद्द सम्मेलनांतहि गोळा झाल्या हें लक्षांत घेतां **साहित्य-परिषदेचें स्वतंत्र मंदिर** सिद्ध होण्यास जनतेचें साहाय्य अवश्य मिळेल एवढें अगदी निखालस म्हणतां येईल. परंतु जनतेची ही सुप्त अनुकूलता जागृत करून तिला व्यावहारिक रूप देण्याचें काम परिषदेचें आहे.

कोषरचनेसंबंधाने आपल्या परिषदेच्या उद्देशांत असेंच एक महत्त्वाचें कलम आहे. त्यासाठीं इंदुरास दहा हजारांची देणगी मूळ मिळाली. परंतु ज्ञानकोश-मंडळ व शब्दकोश-मंडळ यांची स्वतंत्र स्थापना होऊन एका नवीन म्हणजे कंपनीस्थापनेच्या तत्त्वाचा उपयोग करून हीं मोठालीं कामें चालीसहि लागलीं हें आपण प्रत्यक्ष पाहात आहों. भारत-गौरव-ग्रंथमाला, नवभारत-ग्रंथमाला वगैरे कित्येक उत्तम माला याहि आपापलीं कामें जोमाने चालवीत आहेत. धुळ्याची सत्कार्योत्तेजक सभा, यवतमाळचा शारदाश्रम, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणें, पुणें व वाई येथील मराठी ग्रंथालयें आणि नाशिक, नगर, सांगली, कोल्हापूर वगैरे अन्य बऱ्याच ठिकाणचीं ग्रंथालयें व वाचनालयें, तसेंच मिरजेसारख्या ठिकाणचें खरे-मंदिर वगैरे सारखे अभिनंदनीय उपक्रम जागजागीं सिद्धीस गेले असतां परिषद् मात्र अनाथाप्रमाणे दीन, दुबळी राहावी, ‘नांव मोठें आणि लक्षण खोटें’ असें दूषण तिला लागावें, ही केवढी नामुष्कीची गोष्ट आहे बरें! आम्हीं थोडेसें स्पष्ट आणि कटु असें लिहिलें असलें तथापि तें परिषदेच्या हितबुद्धीने आणि कळकळीने लिहिलें आहे,

त्याचा सर्वांनी शांतपणें विचार करावा अशी आमची विनंती आहे.

उद्देशानंतर आपण हिंदी-साहित्य-सम्मेलनाच्या घटनेकडे वळूं. राजे महाराजे यांना संरक्षक म्हणून घेण्याची स्वतंत्र योजनाहि तींत आहे. आपल्या घटने-प्रमाणे आश्रयदाते किंवा उपकर्ते यापेक्षा दुसरें स्थान तींत नाही. हिं. सा. सं. घटनेप्रमाणे संरक्षकांची निवड त्यांच्या स्थायी समितीवर करतां येते. ही स्थायी समिति एका सम्मेलनापासून तों दुसरें सम्मेलन भरण्यापर्यंत या मधल्या काळांत सम्मेलनाने केलेल्या ठरावानुसार कार्य करते. या स्थायी समितीवर प्रतिनिधि निवडून देण्याचा अधिकार निरनिराळ्या गटांस आहे.[1] मागील सम्मेलनांचे अध्यक्ष आणि प्रधान मंत्री या सर्वांचाहि समावेश स्थायी समितींत केलेला आहे. यामुळे तेथे हिंदी-साहित्य-संस्था आणि हिंदी-साहित्य-संमेलन यांच्यांतील **द्वैतास वाव राहात नाही.** आपल्याकडे घटनादृष्ट्या परिषदेकडे अधिकार अधिक परंतु सम्मेलनाचें बंधन कमी असा जो विषादक प्रकार आहे तो तेथे नाही. आपली घटना आज आहे अशीच ठेवली तर हें विषादाचें बीज तसेंच सलत राहील आणि परिषदेला नेहमी प्रासून दुर्बळ करील. यासाठी या मुख्य दोषाकडे परिषद् आणि सम्मेलन या उभय संस्थांचे चालक काळजीपूर्वक लक्ष देतील अशी आम्हांस आशा आहे. करवीरास परिषदेच्या घटनेसंबंधाने बरीच सुधारणा होऊन पुढील व्यवस्थाहि समाधानकारक चालल्याचें सम्मेलनाच्या निदर्शनास येईल. आता **नागपुरास सम्मेलन व परिषद् यांस एकजीव करण्याचा प्रश्न** अशाच शांतपणें, पोक्तपणें आणि समंजस-पणें विचारांत निघेल आणि परिषद् जी कोल्हापुरापासून बरीच निरोगी झाली आहे तिला नागपुरास सम्मेलन कांही पौष्टिक सुरू करण्याची योजना सिद्धीस नेईल तर ती याहीपेक्षा अधिक कार्यक्षम बनेल असा आम्हांस भरंवसा वाटतो.

हिं. सा. संमेलनाचे ६ मंत्री उर्फ चिटणीस असतात. (१) प्रधान, (२) प्रबंध, (३) प्रचार, (४) परीक्षा, (५) साहित्य, (६) अर्थ. त्यांचे अधिकारहि ठरवून दिलेले आहेत. याखेरीज साहाय्यक मंत्री म्हणून एक वैतानिक कामगार असतो. हितैषी सदस्य म्हणून वार्षिक ३ रु. देणारांचा आणखी एक वर्ग आहे. सभापति म्हणजे संमेलनाध्यक्ष निवडण्यांत

---

१ नोंदलेल्या पत्रकारांतर्फे ५, नोंदलेल्या प्रकाशकांतर्फे ६ आणि सम्मानित ( १००० रु. देणारे ), स्थायी ( २५० रु. देणारे ) आणि साधारण ( १२ रु. देणारे ) सभासदांच्या एकूण संख्येच्या दशांश पण पन्नासाहून कमी इतके प्रतिनिधि; संबद्ध संस्थांच्या १०० सभासदांस एक याप्रमाणे प्रतिनिधि; स्वागतसभेचें ज्या ठिकाणीं सम्मेलन भरतें तेथील स्वागत-समितीचे पांच प्रतिनिधि; आणि सम्मेलनाने निवडलेले ४० प्रतिनिधि. पैकी निदान ८ जेथे सम्मेलनाचें स्थायी कार्यालय असेल त्या ठिकाणचे आणि बाकीच्यांत कोणत्याहि प्रादेशिक पोटविभागांतील १० पेक्षा अधिक नाहीत इतके.

हितैषीसुद्धा सर्वांना अधिकार आहेत. कित्येक प्रश्नांवर लेखी मतें आणि कोठे प्रतिनिधिद्वारा म्हणजे vote by Proxy प्रमाणे व्यवस्था आहे. ज्यांचे निदान १५ तरी सभासद आहेत अशा हिंदीहितैषी सभा किंवा ज्यांना १५ तरी इसम हजर आहेत आणि ज्या केवळ संमेलनास प्रतिनिधि निवडण्यासाठी बोलावल्या आहेत अशा सार्वजनिक सभा यांनाहि संमेलनास प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार आहे. विषयनियामक उर्फ विषयनिर्वाचिनी समितीचें खरें काम स्थायी समितीकडेच सोपविलेलें आहे. स्थायी समितीच्या पसंतीखेरीज संमेलनापुढे ठराव येत नाहीत. स्थायी समितीकडे आलेले संमेलनापुढे मांडावयाचे ठराव स्थायी समितीकडून निदान १५ दिवस तरी पूर्वी वर्तमानपत्रांतून अभिप्रायार्थ प्रसिद्ध केले जातात. आणि मग स्थायी समितीचें एक विशेष अधिवेशन संमेलनाध्यक्षांचें भाषण होण्यापूर्वी भरतें. हें अधिवेशन म्हणजेच विषयनियामक समितीची बैठक होय. ह्या अधिवेशनास आपल्या बाहेरील २५ जाणिक प्रतिनिधि स्थायी समितीला घेतां येतात आणि स्वागतसमितीतर्फे १५ सभासद या सभेंत येतात. असो. हिंदी सा. संमेलनाची **सबंध घटनाच** या दृष्टीने आम्हांस फार अनुकरणीय वाटली.

श्री. कमलाबाईसाहेब किबे प्रभृति जे महाराष्ट्र-साहित्यभक्त हिंदी सा. संमेलनाशी संबद्ध आहेत, त्यांनी याकडे लक्ष पुरवून **महाराष्ट्र-साहित्य-परिषद् आणि संमेलन यांचा एकजीव करणारी घटना** सिद्ध करावी अशी आमची कळकळीची विनंती आहे. नागपूर संमेलनांत जर कोणता एखादा विचार प्रामुख्याने करावयाचा असेल, तर तो आमच्या मतें ह्याच होय आणि **यासाठी एक स्वतंत्र दिवस नागपूरकरांनी राखून ठेवावा** असें आम्ही सुचवितों. हिं. सा. संमेलनाचे मानाने आपण फार मागे आहों. मंगलाप्रसाद-पारितोषिक, सेकसरिया-पारितोषिक यांसारख्या योजना तिकडील संमेलनाच्या हातीं आहेत. इकडे श्रीमंत देवासकरांनी दिलेले पारितोषिक किंवा नुकतेंच श्रीमंत पंतसचीव यांनी देऊं केलेलें वार्षिक ३०० रु. चें पारितोषिक किंवा श्रीमंत इचलकरंजीकर यांनी केवळ ग्रंथप्रकाशनार्थ स्वतंत्र करून ठेवलेला ट्रस्ट इत्यादि सर्व योजना आपल्याकडील साहित्य-संमेलन किंवा परिषद् यांशीं संबद्ध नाहीत. उभय संस्थांची प्रतिष्ठा वाढविल्याशिवाय या बाजूने त्या संपन्न होणार नाहीत. हिं. सा. संमेलनाचा संसार सालीना **अर्धा पाऊण लाखांचा** आहे. आमचा त्याच्या दशांशानेंहि नाहीं. आम्ही लोकसंख्येने त्यांच्या पंचमांश आहों; परंतु आमची संघटनाच दुर्बल आहे हेंच खरें.

यास्तव आमची परिषदेस, नागपूर स्वागत-सभेस आणि संमेलनास जमणाऱ्या सर्व प्रतिनिधींस पहिली विनंती ही आहे की, जे अद्यापि **म. सा. परिषदेचे सभासद झाले नसतील त्यांनी जरूर अगोदर परिषदेचे सभासद व्हावें.** परिषदेचे सभासद नसलेल्या परंतु सभासद होऊं इच्छिणाऱ्या संमेलनप्रतिनिधींकडून **परिषदेने एक रुपयाच शुल्क घेऊन** सभासद करण्याची सवड ठेवावी. स्वागतसभेचे सभासद करतांना आणि

प्रतिनिधि मिळवितांनाच **परिषदेचाहि प्रचार जोडीने व्हावा** आणि हें काम स्वागत-सभेच्या अंगावर न टाकतां **परिषदेमार्फत व्हावें** असेंहि आम्हांस वाटतें. संमेलनाचे तीन रुपये आणि परिषदेसाठीं एक रुपया अशी जोड मागणी केली तर ती पुरविणें जड जाईल असें वाटत नाही. आमच्या पाहण्यांत सालोसाल संमेलनास येणारे परंतु परिषदेची माहिती नसलेले अथवा तिशीं संबद्ध नसलेले असे बरेच साहित्यभक्त आहेत. त्यांना हेरून वरील एक रुपयाच्या युक्तीच्या आकर्षणाने परिषदेंत ओढले पाहिजेत. जसे कोल्हापुरास परिषदेच्या सभासदांस एक रुपया देऊन संमेलनाचा प्रतिनिधि होण्याचा नियम केला तसेंच एक रुपया देऊन संमेलनाच्या प्रतिनिधीस परिषदेचा सभासद होण्याची सोय करणें उचित होईल, असें आम्हांस वाटतें. कारण संमेलनास जाणें ही बाब पुष्कळ खर्चाची आहे, हेंहि विचारांत घेतलें पाहिजे. इंडियन् सायन्स् कांग्रेस् या संस्थेच्या घटनेंत अशी तजवीज असल्याचें आम्ही ऐकलें आहे की सदर कांग्रेस्च्या लागोपाठ भरलेल्या तीन अधिवेशनाला हजर असलेल्या सभासदांना कांही विशेष अधिकार प्राप्त होतात. वाटल्यास तशी कांही योजना करून १ रुपयाची सवलत लागोपाठ भरलेल्या दोन किंवा तीन संमेलनास हजर असलेल्यांनाच ठेवावी. म्हणजे स्थानिक सभासदांच्या पोकळ फुगवटीची काळजी वाटणार नाही. शिवाय अशा सभासदांस मत देण्यासहि मुदतीची हरकत असूं नये. **निदान एवढी तरी सुधारणा यंदा नागपुरास** झाली आणि ती आधी मान्य करून संमेलनास प्रारंभ झाला तर एक किचकट प्रश्न समाधानकारक रीतीने सोडविल्याचें श्रेय आपणा सर्वत्रांस येईल. नागपुरच्या लगत्याला हिंदी प्रांत असल्याने **हिं. सा. संमेलनाच्या संघटनेकडे लक्ष देण्याची अधिक सोय नागपूरकरांस आहे** आणि तिचा भरपूर फायदा नागपूरचे उत्साही कार्यकर्ते संमेलनाच्या पदरांत टाकतील अशी आम्हांस आशा आहे. एक **प्रातिनिधिक बलिष्ठ मध्यसंस्था महाराष्ट्रसाहित्याचा संसार पाहण्यास ठासून उभी राहिल्याशिवाय महाराष्ट्र साहित्याकडे सरकार, विद्यापीठ, स्थानिक संस्था वगैरेंचे होणारें अक्षम्य दुर्लक्ष यशस्वीपणाने हटवितां येणार नाही.**

हिंदी-साहित्य-सम्मेलनास येणाऱ्या प्रतिनिधींच्या शुल्कापैकी अर्धा भाग स्थायी-समितीस व अर्धा भाग स्वागत-समितीस मिळतो. याशिवाय दर सम्मेलनांत आलेले लेख आणि अहवाल छापण्याची व्यवस्था स्वतः स्वागतसमितीने केली नाही तर त्याबाबतचा खर्च स्वागतसमितीने स्थायी-समितीस निराळा द्यावा लागतो. संमेलनाचा अहवाल निदान पुढल्या संमेलनाच्या पूर्वी तरी प्रसिद्ध व्हावा हें इष्ट होय; आणि तसें घडून येण्यासाठी कांही स्पष्ट तजवीज आपल्या घटनेमध्येच करावी असें आम्हांस वाटतें. स्वागतसमितीने संमेलन झाल्यापासून चार महिन्यांचे आंत हिशोबासह अहवाल पुरा करून पुढील चार महिन्यांच्या आंत तो छापून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करावी, असा नियम केल्यास तितकी जबाबदारी स्वागत समित्यांवर ओघानेच पडेल. वास्तविक प्रथम होणारीं अध्यक्षीय भाषणें आणि संमत झालेले ठराव एवढा अहवालाचा पहिला

भाग समजून तो संमेलन झाल्यापासून एक महिन्याच्या आंत सहज प्रसिद्ध करतां येईल; आणि ही तजवीज नियमांतच अंतर्भूत केल्यास तिचा अंमल अधिक तत्परतेने होईल. यानंतर हिशेब, भाषणें, समारंभवगैरे बाबींचीं वर्णनें हा दुसरा भाग आणि लेख, निबंध, कविता, फोटोवगैरे हा तिसरा भाग, असे आणखी दोन भाग पुढील तीन महिन्यांत तयार होऊन त्यापुढील चार महिन्यांत छापून प्रसिद्ध करणें अवघड नाही. या खर्चाची तजवीज, तसेंच यासंबंधीचें दप्तरी व चिटणिशी काम यांची तजवीजहि स्वागत-मंडळाने आगाऊ करून त्याकरिता कांही पैसा राखून ठेवून मगच इतर योजना आखाव्या आणि इतर खर्च धरावे. पुणें-संमेलनाच्या वेळीं प्रतिनिधींच्या आदरातिथ्यांत कमी पडल्यास तो दोष पत्करूनहि वरीलप्रमाणे तजवीज केल्यामुळेच अवघ्या बाराशें रुपयांच्या खर्चांत अहवाल-छपाईचें काम सहज उरकतां आलें. हजारो रुपये आदरातिथ्यांत खर्चण्याचा जो मोह आपणांस पडतो त्याला आपणच आवर घालून कामाची ओढ अधिक धरली तर खऱ्या समाधानाला आपण अधिक अधिकारी होणार नाही काय ?

स्थानिक कार्यकर्ते संमेलनाचा जेव्हा साहित्यसोहळा करवितात त्यावेळीं बऱ्याच दणग्याहि मिळविण्याची खटपट होते. हे देणग्या देणारे उदार गृहस्थ म. सा. परिषदेशीं असंबद्ध व अपरिचित राहतात हें कांही बरें नाही. इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष संमेलनप्रसंगीं जेव्हा परिषदेच्या सभा भरतात त्यावेळीं असले उदार गृहस्थ --ते स्वागताध्यक्ष असले तरीसुद्धा-- परिषदेंत गणतां येत नाहींत, ही स्थिति फारच संकोच उत्पन्न करणारी आहे--नव्हे अवमानास्पदहि आहे--हें आम्ही सांगावयास पाहिजे असें नाही. स्वागताध्यक्षच काय, पण संमेलनाध्यक्षसुद्धा परिषदेचे सभासद असतातच असें नाही. मग संमेलनाने ठराव करावे आणि त्यांची जबाबदारी परिषदेने घ्यावी असें एकीकडे अपेक्षावें, तों दुसरीकडे आपली आर्थिक दुर्बलता आणि आपली कारभारी असहायता मनांत येऊन, परिषदेच्या अभिमान्यांनी सावधपणाचा आणि शक्याशक्यतेचा इशारा देणारी मांडणी करून, संमेलनाने अपेक्षिलेली जबाबदारी अंगावर घेण्यास आपली नाखुषी दर्शवावी आणि या ओढाताणींत स्वागताध्यक्षप्रभृति स्थानिक उदार सहायकांना परिषदेंत आपण कोणीच नव्हे अशी जाणीव आंत बोंचत राहून 'ही सासूबाई कोण?' असें परिषदेविषयी मनांत म्हणण्यास जागा राहावी ही आमच्या मतें अत्यंत शोचनीय गोष्ट होय. यास्तव यावरहि कांही तोड काढून घटनेमध्ये घातली पाहिजे. हिं. सा. संमेलनाच्या घटनेत ही फूट उठूं दिलेली नाही. आपणांसहि तशी कांही तजवीज करतां येणार नाही काय ? आजच आमच्या नागपूरकर मित्रांनी उत्साहाने बऱ्याच देणग्या मिळविल्या आहेत. उद्या संमेलनाच्या वेळीं या उदार साहाय्यकांपैकी फारच थोड्यांस परिषदेच्या वाटाघाटींत अधिकार राहील अशी आम्हांस भीति वाटते. यासाठी आमची सूचना अशी आहे की, संमेलनासाठी दीडशें रुपये देणाऱ्या सभासदांस आपल्या हल्लीच्या घटनेप्रमाणे म. सा. परिषदेचा

पु।९८

तहाहयात सभासद समजण्यांत यावें. याहून अधिक देणग्या देणारांस दिलेल्या देणगीच्या रकमेच्या एक तृतीयांश रकमेंत परिषदेचा हितकर्ता किंवा आश्रयदाता यांपैकी ज्या वर्गांत बसवितां येईल त्यांत बसवावें. अशा सभासदांस मताधिकार मिळण्यास मुदतीचां हरकत नसावी. **संमेलन हें परिषदेचेंच एक कार्य आहे** हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे.

संमेलनाध्यक्ष व स्वागताध्यक्ष हे अधिकारतःच परिषदेचे तहाहयात सभासद समजण्यांत यावे असाहि एक नियम करणें योग्य होईल. आजपर्यंतचे सर्व संमेलनाध्यक्ष व स्वागताध्यक्ष याप्रमाणे पूर्वीच सभासद झालेले नसल्यास तहाहयात सभासद म्हणून दाखल करण्यांत यावे अशी आमची सूचना आहे. असो.

संमेलन व परिषद् एकजीव करण्याविषयी व्यावहारिक दृष्टीने कांही ऊहापोह व सूचना आम्ही येथवर केल्या आणि आमच्या मतांचें दिग्दर्शन केलें. **हिं. सा. संमेलनाची** घटना या कामीं आपणांस बरीच मार्गदर्शी होईल. **नुसत्या घटनेंत सुधारणा केल्याच्या योगानें सर्व कांही यथास्थित होईल असें कोणीहि समजूं नये.** असें आहे तथापि व्यावहारिक दृष्टीने सोयीस्कर घटना असणें हेंहि मार्गदर्शक व फायदेशीर होतें; आणि म्हणूनच आम्ही हा उद्योग केला आहे. नागपुरास भरणाऱ्या परिषदेच्या ता. २४ च्या सभांमध्ये याचा विचार होईल अशी आम्हांस आशा आहे. तात्पर्य, महाराष्ट्रांतील सर्व लहानमोठ्या साहित्यसंस्था परिषदेशीं संबद्ध करणें, सर्व प्रमुख महाराष्ट्रीय साहित्यभक्त यांस परिषदेचे सभासद करणें, परिषदेसाठी एक कायमचें मंदिर आणि कायमची कचेरीची व्यवस्था करणें आणि येणेंप्रमाणे आपलें बळ वाढवून उदासीन व विरोधी असलेलें सरकार, विद्यापीठें वगैरेंस महाराष्ट्र भाषेविषयींचीं कर्तव्यें करावयास लावणें आणि स्वभाषेविषयी अभिमान वाढवून महाराष्ट्रभाषा व वाङ्मय सर्वतया संपन्न करणें हें ध्येय डोळ्यापुढे ठेवून आपण श्रद्धेने, व्यवस्थेने आणि अचूकपणाने कार्य करीत राहिल्यास यशःप्राप्तीसंबंधाने आम्हांस शंका नाही. आणि ज्यापक्षीं ट्रस्टी व आमचे 'सहीकर' मित्र यांच्या मनांतील शंका जाऊन आता सर्वत्र समाधान व ऐक्य उद्भवलें आहे आणि आज बरींच वर्षें चालू असलेले दुःखकारक वाद संपले आहेत त्यापक्षीं ऐक्याच्या जयजयकारांत नागपुरास आपण उत्साहानें पुढील कार्यास लागूं अशी प्रबळ आशा आम्हांस वाटत आहे. नागपूर-संमेलनापुढील कार्य आम्ही आमच्या मनासमोर याप्रमाणे रेखाटलें आहे. हें कल्पित चित्र खरें झालेलें पाहण्याचा आनंद भोगण्यास आम्ही उतावीळ झाल्याने हा लेख इथेच समाप्त करूं.

## पुरवणी

नागपूरच्या 'महाराष्ट्र' वर्तमानपत्रांत रा. माडखोलकर यानीं आपली एक योजना प्रसिद्ध करून तीवर आलेलीं मतें प्रसिद्ध केलीं आहेत. हल्ली संमेलनाला घटना नाही यास्तव सम्मेलनाच्या कार्याला निश्चित वळण लागावें म्हणून एखादी

घटना नागपूरला मुक्रर करावी याविषयी बहुतेक लेखकांचें एकमत आहे असें दिसतें. यापुढे सम्मेलन आणि परिषद् हीं दोन्हीहि आजच्यापेक्षा अधिक संघटित आणि बलवान् व्हावीं हा हेतु अगदीं सर्वमान्य असा आहे. हल्लींच्या घटनेंतील दोषहि बहुतेकांनीं निर्विवादपणें मान्य केलेले आहेत. रा. यशवंत रामकृष्ण दाते यांनी आपल्या लेखांत या प्रकारचा सुसंगत इतिहास दिला असून कांही उपायहि सुचविले आहेत. ग्वाल्हेरचे रा. माकोडे यांनी कोल्हापुरास पाठविलेली आपली योजना पुनः विचारांत घेण्याविषयी कळकळीने लिहिलें आहे. यावरून नागपुरांत या प्रश्नाचा बराच खल होईल अशी आशा वाटत आहे.

हिंदी साहित्यभक्त हे देखील आम्ही प्रशंसिलेल्या त्यांच्या घटनेमध्ये अनुभवाने फेरफार करण्यास उत्सुक झाल्याबद्दल रा. माकोडे यांनी आम्हास कळविलें आहे. हिंदी–साहित्यसंमेलन या संस्थेची स्थिति आणि तिचा इतिहास व महाराष्ट्र-साहित्य-परिषद् आणि तिचा इतिहास यांच्यामध्ये साहजिकच अंतर आहे. एकाला जें भावेल तेंच दुसऱ्याला मानेल असें समजणें चुकीचें होईल. आणि म्हणूनच सांप्रतच्या आपल्या घटनेंत असे कोणते फेरफार करावे की, जेणेंकरून सम्मेलन आणि परिषद् हीं अधिक समरस होतील, हाच विचार आता आपण सर्वांनी केला पाहिजे. हिं. सा. सम्मेलन हीच मोठी संस्था असून तिकडे निराळी अशी परिषद् नाही. संबद्ध संस्था, स्थायी समिति वगैरेंची योजना तिकडील घटनेंत विचारपूर्वक केलेली आहे आणि तीच तंतोतंत आपण घ्यावी, असें आमचें बिलकूल म्हणणें नाही. आपल्या प्रगतीला पोषक असेल तेवढाच बदल आपण करणें उचित ठरेल. आणि या दृष्टीने आम्ही आपलें म्हणणें कांहीसें स्पष्टपणें पुढे मांडलें आहे. घटनेचा हल्लींचा आपला आराखडा शक्य तोंवर कायम ठेवून आम्ही आपल्या सूचना बसविल्या आहेत, ही गोष्ट या लेखाच्या वाचकांनी लक्षांत घ्यावी.

म. सा. परिषदेची प्रतिष्ठा व लौकिक हीं प्रथमतः वाढीस लाविलीं पाहिजेत. **नुसत्या कागदी घोडे नाचविण्यानें कांहींएक प्रगति होणार नाहीं.** जों जों परिषदेचें कार्य नेटाने व व्यवस्थेने चालेल तों तों परिषदेविषयींची प्रतिष्ठा व लौकिक हीं साहाजिक वाढूं लागतील. या कामीं सांप्रत मुख्य भासणारी अडचण म्हणजे सम्मेलन-प्रसंगीं उत्पन्न होणारा अपूर्व उत्साह परिषदेच्या द्वारा कार्यकारी करतां येत नाही, ही आहे. यास्तव परिषद् आणि सम्मेलन हीं हल्लींच्या घटनेंत कांही महत्वाच्या सूचना करून अधिक समरस व एकजीव करण्याचे उपाय–अगदी तात्कालिक फलदायी असे उपाय–आम्हीं सुचविले आहेत. परिषद् आणि सम्मेलन यांच्यामधील द्वैत कां व कसें उद्भवतें हा मुद्दा रा. दाते यांनी आपल्या ‘ महाराष्ट्रां’तील लेखांत विशद केला आहे. यावर उपाययोजना काय करावी हें आम्ही सविस्तर दाखविलेंच आहे. आणि तीच चर्चा अगोदर परिषदेच्या सभांत व मागाहून सम्मेलनांत व्हावी आणि जरूर

तर एखादा स्वतंत्र दिवस यासाठीं राखून ठेऊन हा प्रश्न दूरदृष्टीने आणि समंजसपणें निकालांत काढावा, असें आम्ही सुचवीत आहों.

रा. माकोडे यांनी सुचविलेली योजना सविस्तर व बरीच व्यापक अशी आहे; परंतु आमच्या मतें परिषदेच्या व सम्मेलनाच्या आजच्या स्थितींत ती योजना अगदी डोईजड अशी वाटल्यावांचून राहणार नाही. **आज अगोदर आपण म. सा. परिषदेचा पाया भक्कम केला पाहिजे.** तो पायाच अजून कच्चा आहे. आज जेथे तीन रुपये सालिना वर्गणी देऊन सभासद होण्याची उत्सुकता व शक्यता अल्प प्रमाणांतच दृग्गोचर होत आहे तेथे कोणी आपले लेख परिषदेकडून तपासून घेऊन आणि त्याकरिता दोन, पांच, पंधरा रुपये सत्कार देऊन परिषदेकडून पदवी घेण्यास पुढे येईल असें आम्हांस तरी बिलकूल वाटत नाही. आपल्या कार्यामुळे परिषदेविषयी ज्यावेळीं सर्व महाराष्ट्रभर आदराची व प्रेमाची भावना जोमांत आलेली दिसेल आणि ठिकठिकाणीं अनेक साहित्यमंडळें व ग्रंथालयेंवगैरे निघून त्याच छोटया छोटया संस्था मूळ परिषदेशीं आपला संबंध जोडण्याची अहमहमिका प्रकट करूं लागतील, जेव्हा परिषदेचा कौल कसा पडतो हें पाहाण्याची मोठ्यामोठ्या विद्वान् व नामांकित लेखकांत उत्सुकता आढळून येईल, म्हणजेच ज्यावेळीं परिषदेचे सभासद हजारांनी मोजावे लागतील आणि तिचा वार्षिक जमाखर्च लाखांत करावा लागेल त्याचवेळीं पदव्या देण्याचा उपक्रम परिषदेने हातीं घेतल्यास शोभण्यासारखा आहे; आणि त्यावेळीं रा. माकोडे यांनी आंखल्याप्रमाणे योजना खरोखरीच आंखणें प्राप्त होईल. रा. माकोडे यांनी आपली योजना श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांजकडे सादर केली होती. त्याप्रमाणे ज्या दिवशीं श्रीमंत महाराजांसारखे सुविद्य, सुसंस्कृत आणि समर्थ असे महाराष्ट्र साहित्याभिमानी प्रभु आपण होऊन या कामीं पुढाकार घेतील किंवा ग्वाल्हेर सम्मेलनाच्या वेळीं श्रीमंत चंद्रोजीराव आंग्रे यांस आम्ही सुचविल्याप्रमाणे असलीं थोर माणसें जेव्हा महाराष्ट्र-साहित्याचें दैन्य फेडण्याकरिता भिक्षेकरी बनतील तेव्हाच शारदा-मंडळासारख्या किंवा रा. माकोडे यांच्या साहित्य-मंडळासारख्या भव्य योजना प्रत्यक्ष सृष्टींत उतरणें शक्य होईल.शारदा-दिन पाळण्याविषयींची सूचना रा. माकोडे यांच्या योजनेंत आहे; आणि येथील महाराष्ट्र-साहित्य-मंडळाचे रा. अधिकारी यांनीहि यासंबंधीची योजना आम्हाकडे पाठविली आहे. असली कांही योजना सर्वत्र व्हावी असें आम्हासहि वाटतें. याविषयींचें विचार आम्ही अन्यत्र लिहूं. रा. माकोडे यांनी प्रसिद्ध केलेल्या योजनेबद्दल त्यांचे आभार मानून रा. माडखोलकर, रा. पटवर्धन, रा. हर्षे, रा. दाते, रा. पेंडसेप्रभृतींनी जी चर्चा चालविली आहे तींतून कांहीतरी विधायक असा भाग नागपुरास सर्वसम्मत होऊन परिषद् आणि सम्मेलन हीं दोन्हीही अधिक बलवान् करण्यांत येतील, अशी आम्हांस आशा आहे.

द. वा. पोतदार

———

# रा. कृ. प्र. खाडिलकर यांच्या चरित्राचा आराखडा

( टीपः– रा. पी. आर्. लेलेकृत ओळखपर चरित्राचे साहाय्याने )

**जन्मः**– सन १८७२ नोव्हेंबर, शके १७९४ कार्तिक, मुक्काम सांगली.

**शिक्षणः**– मॅट्रिकपर्यंतो सांगलीस. पुढे फर्ग्युसन् कॉलेज् व डेक्कन् कॉलेज्, पुणें.

**परीक्षाः**– बी. ए. सन १८९२.

**व्यवसायः**– दोन वर्षे सांगलीस शिक्षक; आणि सवाई माधवरावाचा मृत्यु या नाटकाचें लेखन.

**मुंबईस प्रयाणः**– एल्एल्. बी. साठीं; तेथे रा. न. चिं. केळकर व रा. श्री. कृ. कोल्हटकर यांची मैत्री. रा. कोल्हटकर यांच्या शिफारशीवरून विविधज्ञानविस्तारांत 'सवाई माधवरावाचा मृत्यु' हें नाटक प्रसिद्ध झालें.

**केसरीशीं संबंधः**– १८९६ च्या दुष्काळांत केसरींत लेख लिहिणें आणि दुष्काळाविषयीं व्याख्यानें देणें.

**दुसरें नाटकः**– १८९७ 'कांचनगडची मोहना'. विजापुरचा किल्ला पाहून सुचलेलें.

**पुनः केसरीः**– टिळकांच्या शिक्षेच्या काळांत केसरीचे संपादक.

**नेपाळांत रहिवासः**– १९०२ पासून १९०४ पावेतों रा. खाडिलकर नेपाळांत राहून मातीच्या कौलांचा कारखाना चालवीत असत. लोक यांना 'टाइल्भट' म्हणत.

**नाटक मंडळ्यांशीं परिचयः**–महाराष्ट्र नाटक मंडळीशीं परिचय सन १९०४; 'कां. ग. मोहना नाटक' प्रथम शाहू नगरवासी मंडळीने बसविलें होतें पण त्याहीपेक्षा तें महाराष्ट्र नाटक मंडळीने अधिक यशस्वी केलें. नंतर 'सवाई माधवरावाचा मृत्यु' हें छाटाछाट करून त्याची वरील मंडळीसाठी रंगावृत्ति केली.

**पुनः केसरीः**–बंगभंगाची चळवळ १९०५ सालीं जोरांत सुरू झाली आणि रा. खाडिलकर पुनः केसरींत आले ते १९१० पावेतों संपादक राहिले.

**पुढील नाटकें**:– १९०७ 'कीचकवध', १९०९ 'भाऊबंदकी', १९१० प्रेमध्वज.

**मुंबईस मुक्कामः**– (किर्लोस्कर नाटक मंडळीबरोबर), मुंबईस जाऊन मानापमानाची तयारी. संगीत नाटकांचा आरंभ. 'मानापमान' १९११; 'विद्याहरण' १९१३; ( गंधर्व नाटक मंडळी ). 'सत्त्वपरीक्षा १९१४; 'स्वयंवर' १९१६.

**पुनः केसरीः**–१९१८ – १९२०.

**संपादक 'लोकमान्य' दैनिक मुंबईः**– १९२० – १९२२.

**संपादक 'नवाकाळ'**:– १९२२ पासून. ( या काळांत 'द्रौपदी' 'मेनका' 'सवतीमत्सर' व 'सावित्री' हीं नाटकें ).

द. वा. पोतदार